दाखल तारीख :— २४/१०/२०१३.
नोंदणी तारीख :— २४/१०/२०१३.
निकाल तारीख :— २१/१०/२०१५.
कालावधी :— ०१ व. ११ म. २७ दि.

**औरंगाबाद येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, न्यायालय क्रमांक ५ यांचे न्यायालयात...**
**( पिठासीन अधिकारी सौ.ज्यो.वि.पेखळे—पुरकर )**

**नियमीत फौजदारी खटला क्रमांक १७५४/२०१३. निशाणी क्र.**

महाराष्ट्र सरकार
द्वारा — पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी,
पोलीस ठाणे उस्मानुपरा, औरंगाबाद. ... **अभियोगपक्ष.**

विरुध्द

सचिन सखाराम गायकवाड
वय — २१ वर्षे धंदा — नोकरी
राहणार — फुले नगर,
उस्मानपुरा, औरंगाबाद. ... **आरोपी.**

**वकीलपक्ष** —

अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. बी. एम. राठोड.
आरोपीतर्फे वकील एस. एन. तलवार.

**न्यायनिर्णय**
( घोषित दिनांक २१/१०/२०१५ )

प्रस्तुत खटल्यामध्ये आरोपी विरुध्द भारतीय दंड विधान (यानंतर "भा.दं. वि." असा संक्षिप्त उल्लेख) कलम ४५४, ३८० अन्वये गुन्हा केल्याबाबत दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे.

२. अभियोगपक्षाची थोडक्यात हकीगत खालीलप्रमाणे —

दिनांक १५/०३/२०१३ रोजी खबर देणार नामे शशीकांत संकठा पांडेय, राहणार विवेकानंद पुरम, पीर बाजार, उस्मानुपरा, औरंगाबाद घराच्या दरवाजाला कुलूप लावून त्यांचे पत्नीसह नेहमीप्रमाणे नोकरीवर गेला होता. दुपारी ०२.०० वाजेच्या

सुमारास खबर देणार जेवण करण्याकरीता पून्हा घरी आला असता दरवाजाचे कुलूप उघडे होते. शयन कक्षातील सुटकेस उघडलेली होती. त्यातील रोख रक्कम रुपये १५,०००/—, कानातले तिन जोड व दोन अंगठया असा एकुण रुपये ३७,०००/— किंमतीचा ऐवज चोरीला गेला होता. सबब, खबर देणारने अज्ञात इसमाविरुध्द उस्मानुपरा पोलीस ठाणे येथे खबर दाखल केली.

३. खबरीच्या अनुषंगाने उपरोक्त नमुद कलमांप्रमाणे गुन्हा केल्याबाबत अज्ञात इसामाविरुध्द गुन्हा क्रमांक । — ४६/२०१३ नोंद करण्यात आला. पोलीस उप निरीक्षक पाटील यांनी सदर गुन्ह्याचा तपास केला. गुन्ह्याच्या तपासादरम्यान त्यांनी घटनास्थळ पंचनामा तयार केला, साक्षीदारांचे जवाब नोंदविले. प्रस्तुत आरोपीच्या ताब्यातुन प्रस्तुत प्रकरणातील चोरीला गेलेल्या मुददेमालापैकी एक सोन्याचा कानातला जोड जप्त करण्यात आला. आरोपीस प्रस्तुत गुन्हयाकामी अटक करण्यात आली. गुन्हयाचा उर्वरीत तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपीविरुध्द दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. भा.दं.वि. कलम ४५४ व ३८० प्रमाणे गुन्हा केल्याबाबत निशाणी क्रमांक ०९ अन्वये आरोपीविरुध्द दोषारोप निश्चित करण्यात आला. त्यातील मजकूर आरोपीस वाचून व समजावून सांगितला. आरोपीने निशाणी क्रमांक १० अन्वये निवेदन नोंदवून गुन्हा कबूल नसल्याचे सांगितले. सबब, खटल्याचे कामकाज पुढे चालविण्यात आले.

५. अभियोगपक्षाच्या पुराव्यादरम्यान आरोपीविरुध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा न्यायालयीन अभिलेखावर न आल्याने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये आरोपीचे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

६. अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता व आरोपीतर्फे विद्वान वकील एस. एन. तलवार यांचा युक्तिवाद ऐकला.

७. निर्णयासाठी उपस्थित झालेले मुद्दे त्यावरील माझ्या निष्कर्षांसह खालीलप्रमाणे नमुद केले आहेत —

| | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने चोरी करण्याच्या उद्देशाने सदनिका क्रमांक ६, वरुण प्राईड अर्पाटमेंट, विवेकानंद पुरम, उस्मानुपरा, औरंगाबाद येथे खबर देणारच्या सदनिकेच्या दरवाजाचे कुलूप तोडुन तेथे अपप्रवेश केला, हे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | ...नाही. |
| २. | आरोपीने उपरोक्त नमुद सदनीकेतुन चोरी करुन रोख रक्कम रुपये १५,०००/— व रुपये २२,०००/— किंमतीचे सोन्याचे दागीने चोरी केले, हे अभियोगपक्षाने शाबित केले आहे काय ? | ...नाही. |
| ३. | आदेश काय ? | आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले. |

## कारणमिंमासा

**मुद्दा क्रमांक १ व २ करीता —**

८. सदर दोन्ही मुद्दयांबाबत न्यायालयीन अभिलेखावर देण्यात आलेला पुरावा साधर्म्य असणारा असल्याने पुनरावृत्ती टाळण्याकरीता सदर मुद्दयांचे विवेचन एकत्रितपणे करण्यात येत आहे.

९. अभियोगपक्षातर्फे केवळ खबर देणारची साक्ष निशाणी क्रमांक ११ प्रमाणे नोंदविण्यात आलेली आहे. खबर देणारने त्याच्या साक्षी दरम्यान तो व त्याची पत्नी नोकरीवर गेले असतांना त्यांच्या राहत्या सदनिकेच्या दरवाजाचे कुलूप तोडून तेथे प्रवेश करुन अज्ञात इसमाने रोख रक्कम रुपये १५,०००/—, तिन कानातले जोड व दोन अंगठया हा ऐवज चोरी केला होता, असे सांगितले आहे. त्यानुसार त्याने खबर (निशाणी क्रमांक १२) दाखल केली. चार पाच महिन्यानंतर पोलीसांनी मुददेमाल सापडल्याबाबत त्याला फोनव्दारे सांगितले असेही त्याचे कथन आहे. मात्र पोलीसांनी त्याला सापडलेला मुददेमाल तसेच आरोपी त्याला दाखविला नसल्याचे त्याने नमुद

केले आहे. अभियोगपक्षातर्फे त्याला सुचनात्मक प्रश्न विचारण्यात आले. मात्र त्याव्दारे देखील प्रस्तुत आरोपीकडून सदर मुददेमाल जप्त करण्यात आल्याबाबत पुरावा न्यायालयीन अभिलेखावर आलेला नाही. खबर देणारने पुरसिस (निशाणी क्रमांक १४, १५) दाखल करुन त्याला आरोपीविरुध्द प्रस्तुत प्रकरण पुढे चालवायचे नाही, तसेच अन्य साक्षीदार देखील तपासायचे नाहीत, असे नमुद केले. अभियोगपक्षातर्फे सरकारी वकीलांनी देखील अन्य साक्षीदार तपासायचे नाहीत, असे तोंडी नमुद केले. त्यामुळे प्रकरणाचे कामकाज पुढे चालविण्यात आले. न्यायालयीन अभिलेखावर देण्यात आलेल्या एकंदरीत पुराव्यावरुन अभियोगपक्षाच्या हकीकतीत नमुद घटनेशी प्रस्तुत आरोपीचा संबंध असल्याचे शाबीत झालेले नाही. पर्यायाने आरोपीवर ठेवण्यात आलेले दोषारोप देखील शाबीत झालेले नाही. सबब, मुद्दा क्रमांक १ व २ चा निष्कर्ष नकारार्थी आहे.

**<u>मुद्दा क्रमांक ३ करीता</u> —**

१०. आरोपीने भारतीय दंड विधान कलम ४५४ व ३८० प्रमाणे गुन्हा केला आहे, हे अभियोगपक्षातर्फे न्यायालयीन अभिलेखावर देण्यात आलेल्या तोंडी तसेच कागदोपत्री पुराव्यावरुन संशयातितपणे शाबित झालेले नाही. त्यामुळे या कलमांप्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपाकरीता आरोपीस दोषी धरता येणार नाही. आरोपी सदर दोषारोपातून निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७—अ अन्वये आरोपीने मा.वरिष्ठ न्यायालयाने कोणत्याही अपिलाकामी अथवा अन्य प्रकरणाकामी हजर होण्याकरीता सुचना जारी केल्यास तेथे हजर होण्याकरीता रक्कम रु.५,०००/— चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचे जामीन बंधपत्र सादर करण्याचे निर्देश देणे आवश्यक आहे. जप्त मुददेमाल एक सोन्याचा कानातील जोड २९.९० मिलीग्रॅम वजन असलेला च्या मालकीबाबत खबर देणार व्यतीरीक्त अन्य कोणाचाही दावा नाही. त्यामुळे वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याचा कालावधी संपल्यानंतर सदर मुददेमाल खबर देणारचे ताब्यात देणे उचित होईल. सबब, मुद्दा क्रमांक ३ च्या निष्कर्षाच्या अनुशंगाने मी खालीलप्रमाणे आदेश देत आहे —

## <u>आदेश</u>

१. आरोपीस भारतीय दंड विधान कलम ४५४ व ३८० प्रमाणे गुन्हा केल्याबाबत ठेवण्यात आलेल्या दोषारोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २४८ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२. आरोपीचे जामीन बंधपत्र रद्द करण्यात येत आहे. त्यास मुक्त करण्यात येत आहे.

३. आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७—अ अन्वये रु.५,०००/— चे वैयक्तिक बंधपत्र व तेवढ्याच रकमेचे जामीन बंधपत्र सादर करावे.

४. वरिष्ठ न्यायालयात दाद मागण्याचा कालावधी संपल्यानंतर जप्त मुददेमाल एक सोन्याचा कानातील जोड २९.९० मिलीग्रॅम वजन असलेला कायमस्वरुपी खबर देणार शशीकांत संकठा पांडेय यांच्या ताब्यात देण्यात यावा.

स्वाक्षरित/—
**(सौ.ज्यो.वि.पेखाळे—पुरकर)**,
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
(न्यायालय क्रमांक ५), औरंगाबाद.

दिनांक : २१/१०/२०१५.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment/Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | M.V.Powale |
| Court | : | In the Court of Mrs.J.V.Pekhale-Purkar, 5th Jt.Civil Judge (J.D.) and Judicial Magistrate First Class, Aurangabad. |
| Date | : | 21/10/2015 |
| Judgment /Order signed by the presiding officer on | : | 21/10/2015 |
| Judgment/Order uploaded on | : | 26/10/2015 |